# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१९

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

### हिंगोली जिल्हयातील इंदिरा आवास योजनेच्या लाभार्थ्यांना घरकुलांचा प्रलंबित निधी देण्याबाबत

**(१) ५८१४२ (२०-०८-२०१६). श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मागील दोन वर्षापासून इंदिरा आवास योजनेच्या लाभार्थ्यांना घरकुलांचा साडेसात कोटी रुपयांचा निधी हिंगोली जिल्हयाला देण्याचे उदिष्ट आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,या योजनेमुळे गरजू लाभार्थ्यांना घरकुलांसाठी प्रतिक्षा करावी लागणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, लाभार्थ्यांना घरकुलाचा उर्वरित निधी कधी मिळणार व निधी तात्काळ मिळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्रीमती पंकजा मुंडे (१३-०२-२०१९) :**(१) सन २०१४-१५ मध्ये हिंगोली जिल्हयास देण्यात आलेले एकूण उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी अपेक्षित असलेल्या केंद्र समरूप राज्य हिश्याचा रू.१७.४१ कोटी निधीपैकी रू.१३.९१ कोटी निधी उपलब्ध करण्यात आला.

(२) नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### चंद्रपूर जिल्हा परिषद महिला व बालकल्याण विभागास प्रोटीन पावडर युनिजिलेस लाईफ सायन्स लि. या कंपन्याकडुन निकृष्ट दर्जाची प्रोटीन पावडर पुरविल्याबाबत

**(२) ७३९३६ (१८-०४-२०१७). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हा परिषद महिला व बालकल्याण विभागास युनिजिलेस लाईफ सायन्स लि. या कंपन्याकडुन निकृष्ट दर्जाची प्रोटीन पावडर पुरविल्याचे माहे जानेवारी २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-०२-२०१९) :** (१), (२), (३) व (४)

ग्रामीण भागातील अंगणवाडी कार्यक्षेत्रातील ६ महिने ते ६ वर्ष वयोगटातील बालकांना प्रोटीन पावडरचा पुरवठा करणे या योजनेतंर्गत सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात विविध लेखाशिर्षांतर्गत प्राप्त तरतूद रू.४९.०० लक्ष इतकी आहे.

या योजनेतंर्गत प्रोटीन पावडर खरेदी करण्यासाठी जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रूग्णालय, चंद्रपूर यांच्याकडून प्राप्त प्रोटीन कंन्टेटनुसार चंद्रपूर जिल्हा परिषदेने दि. ३.१०.२०१६ च्या पत्रान्वये ई निविदा मागविल्या होत्या.

सदर ई-निविदा प्रक्रियेमध्ये एकूण ८ निविदाधारक सहभागी झाले होते. त्यापैकी ५ पात्र निविदाधारकांमधून युनिजुल्स लाईफ सायन्स लि., एम. आय.डी.सी. परिसर,कळमेश्वर,नागपूर या कंपनीच्या प्रोटीन पावडरचे दर सर्वांत कमी असल्याने त्यांच्याकडून प्राप्त नमुन्याची तपासणी अन्न विश्लेषक, प्रादेशिक लोक आरोग्य प्रयोगशाळा, नागपूर यांच्याकडे तपासणीसाठी पाठविण्यात आले. अन्न विश्लेषक,प्रादेशिक लोक आरोग्य प्रयोगशाळा, नागपूर यांनी दि. १५.१२.२०१६ रोजी जिल्हा परिषद, चंद्रपूर यांना सादर केलेल्या तपासणी अहवालामध्ये निविदेत मागविण्यात आलेल्या प्रोटीनच्या प्रमाणापेक्षा म्हणजे ३२% पेक्षा कमी प्रोटीनचे प्रमाण आढळून आले.

त्यानंतर दि. २७.१२.२०१६ रोजी सदर कंपनीच्या प्रतिनिधीने त्यांच्याकडील प्रोटीन पावडरमध्ये प्रोटीनचे प्रमाण ३१.१०% असल्याबाबतचा अहवाल जिल्हा परिषद, चंद्रपूर कार्यालयास सादर केला. अन्न विश्लेषक, रिजनल पब्लिक हेल्थ लेबॉरटरी, नागपूर यांनी ३२.१०% प्रोटीनचे प्रमाण असलेला अहवाल बनावट असल्याने तो गाह्य धरण्यात येवू नये असे जिल्हा परिषद, चंद्रपूर कार्यालयास कळविले. त्यामुळे युनिजुल्स लाईफ सायन्स लि. या कंपनीच्या विरोधात दि.२१.१.२०१७ रोजी रामनगर पोलिस स्टेशन , चंद्रपूर येथे तक्रार नोंदविण्यात आलेली असून कलम ४६८,४७१,४२०,३४ अन्वये गुन्हयाची नोंद करण्यात आली आहे.

तसेच चंद्रपूर जिल्हा परिषदेने सदरची खरेदी प्रक्रिया रद्द केलेली आहे.

---

**आपटा, न्हावा, साई, कंरजाडे, केळवणे (ता.पनवेल,जि.रायगड) ग्रामपंचायतीतील सदस्यांकडे शौचालय नसल्याबाबत**

**(३) ७५०७१ (१८-०४-२०१७) श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात निर्मल भारत अभियानातंर्गत प्रत्येक कुटुंबाकडे शौचालय आवश्यक असून त्याचा वापरही बंधनकारक असताना पनवेल (जि.रायगड) तालुक्यातील आपटा, न्हावा, साई, कंरजाडे, केळवणे ग्रामपंचायतीतील एकूण १४ सदस्यांकडे शौचालयच नसल्याचे माहे जानेवारी २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्र व राज्य शासनामार्फत शौचालय बांधण्यासाठी अनुदानही दिले जाते असे असतानाही ज्या ग्रामपंचायत सदस्याकडे शौचालय नाही अथवा शौचालयाचा वापर करत नाही अशा सदस्यांना सदस्यत्व अपात्रतेची कारवाई करण्याची शासनाची तरतुद आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हा परिषद प्रशासनाने निर्मल ग्रामयोजनेअंतर्गत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सर्व जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत सदस्यांना शौचालय बांधण्याच्या सुचनाही केल्या असताना १४ ग्रामपंचायत सदस्यांकडे शौचालये नसल्याचे सिद्ध होवूनही जिल्हा परिषद प्रशासनाने कोणतीच कारवाई केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करून सदर १४ ग्रामपंचायत सदस्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१२-०२-२०१९) :** (१) अशंत: खरे आहे

(२) होय,

(३) ग्रामपंचायत करंजाडे, आपटा, न्हावा, केळवणे व साई या ग्रामपंचायती अंतर्गत ९ सदस्यांकडे वैयक्तिक शौचालय नसुन ते सार्वजनिक व संयुक्त शौचालयाचा वापर करीत आहेत. तसेच ५ सदस्य यांनी वैयक्तिक शौचालयाचे बांधकाम केले असून त्याचा वापर करीत आहेत. कोणीही उघडयावर शौचास जात नाही.

(४) प्रश्न उदभवत नाही.

(५) प्रश्न उदभवत नाही.

---

## उल्हासनगर शासकीय प्रसुतिगृह व रुग्णालयातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(४) ७६५७४ (१५-०४-२०१७). श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय प्रसूतिगृह व रुग्णालय, उल्हासनगर - ४ (जि. ठाणे) येथे वैद्यकीय अधीक्षिका हे पद १२ जून, २०१३ पासून, स्त्रीरोग प्रसुतितज्ञ हे पद ३१ मे, २०१४ पासून, सार्वजनिक आरोग्य परिचारिकांची २ पदे सन २०१२ पासून, परिचारिका प्रसाविकेची १ पद सन २०१५ पासून तसेच बहुउद्देशीय आरोग्य कर्मचाऱ्यांची ६ पदे डी.एम.ओ.कडे वर्ग केल्यामुळे रिक्त आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, या रिक्त पदांचा अतिरिक्त भार अधिकारी व कर्मचाऱ्यांवर पडत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त रिक्त पदांवर पूर्णवेळ स्वतंत्र नियुक्त्या करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२५-०२-२०१९) :** (१) हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

रुग्ण कल्याण समितीअंतर्गत कंत्राटीपध्दतीने स्त्रीरोगतज्ञांची सेवा उपलब्ध करुन घेण्यात आली आहे. तसेच आयुष विभागाकरिता राष्ट्रीय आरोग्य अभियानअंतर्गत एक वैद्यकीय अधिकाऱ्याची सेवा उपलब्ध करण्यात आलेली आहे व नागरी आरोग्य केंद्रामध्ये महानगर पालिकेमार्फत राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत परिचारीकांची पदे भरलेली आहेत.

(३) महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ (वेतनबँड रु. १५६००-३९१०० ग्रेड वेतन रु. ६६००) मधील जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी व विशेषज्ञांची सरळ सेवेची पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेतून (दि. ३०.९.२०२१ पर्यंत) वगळून ती स्वंतत्र निवडमंडळामार्फत भरण्याबाबत शासनाने निर्णय घेतला आहे. त्यानुसार सदर संवर्गातील पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच पदोन्नती कोटयातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ (वेतनबँड रु. १५६००-३९१०० ग्रेड वेतन रु. ५४००) मधील वैद्यकीय अधिकाऱ्यांची सर्व पदे भरलेली आहेत.

तसेच गट-क व गट-ड संवर्गातील मंडळ स्तरावरील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

___

**राज्यातील ग्रामपंचायतीच्या निवडणूकांमध्ये सरपंच निवड थेट जनतेतून करण्याबाबत**

**(५) ७७६८० (२०-०४-२०१७) श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर), श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रामपंचायतीच्या निवडणूकामध्ये सरपंच निवड थेट जनतेतून व्हावी अशी मागणी अनेक ग्रामस्थांनी ग्रामविकास विभागाकडे माहे नोव्हेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान पत्राव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील ग्रामविकास विभागाच्या अधिकाऱ्यांनी थेट सरपंच निवडीबाबत दक्षिणेकडील राज्यांमध्ये जावून अभ्यास केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील ग्रामपंचायतीच्या निवडणुकांमध्ये सरपंच निवड थेट जनतेतून करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१२-०२-२०१९) :** (१) राज्यातील ग्रामपंचायतीच्या निवडणूकांमध्ये सरपंच निवड थेट जनतेतून व्हावी अशा मागणीची निवेदने शासनास प्राप्त झाली होती.

(२) ग्रामविकास विभागाचे अधिकारी थेट सरपंच निवडीबाबत मध्यप्रदेश आणि गुजरात या राज्यांमध्ये अभ्यासासाठी गेले होते.

(३) सरपंच निवड थेट जनतेतून करण्याबाबत कायद्यात सुधारणा करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उदभवत नाही.

---

**सिन्नर (जि.नाशिक) तालुक्यातील पांगरी बुदूक या गावात घरकुल योजनेत झालेला गैरकारभार**

**(६) ८००७४ (१७-०४-२०१७) श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिन्नर (जि.नाशिक) तालुक्यातील पांगरी बुदूक या गावात घरकुल योजनेत बाथरुम न करताच अनुदान घेतले, पात्र नसताना लाभ घेणे, अर्धवट बांधकाम असतानाही पूर्ण अनुदानाचा लाभ घेणे असे गैरकारभार होत असल्याचे माहे ऑक्टोंबर २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे शासनाने सद्यास्थितीत राबविण्यात येणारी ही योजना निष्कर्ष पूर्ण करत आहे की नाही याची तपासणी करण्यासाठी तालुक्यातील १२८ गावात नवीन याद्याप्रमाणे हाती घेतलेल्या घरकुल योजनेची पथके नेमून माहिती घेतली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या चौकशीत काय आढळून झाले आहे व त्यानुसार दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१३-०२-२०१९) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) सन २०१६-१७ पासून इंदिरा आवास योजनेचे रुपांतर प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) मध्ये झालेले आहे. सामाजिक, आर्थिक व जात सर्वेक्षण २०११ नुसार सदर योजनेची प्राधान्यक्रम यादी (GPL) आवास सॉफ्टवर प्रसिध्द करण्यात येते. त्यानुसार प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये घरकुलास पात्र लाभार्थ्यांची तपासणी व पडताळणी करण्यात आलेली आहे. पडताळणीमध्ये अपात्र असलेल्या लाभार्थ्यांना मूळ प्रपत्र-ब यादीतून वगळण्यात आलेले असून त्यांना घरकुलासाठी अपात्र ठरविण्यात आलेले आहे.

सदर प्रकरणी संबंधित दोषी कर्मचाऱ्यांविरुध्द प्रशासकीय तसेच फौजदारी गुन्हा नोंदविणे आवश्यक असल्यास त्याप्रमाणे कारवाई करण्याचे निदेश मुख्य कार्यकारी अधिकारी, जि. प. नाशिक यांचे स्तरावरुन देण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## गडचिरोली जिल्हयात तेंदुपत्ता घटक विक्रीमध्ये झालेला गैरव्यवहार

**(७) ८४५३२ (२०-०४-२०१७). श्री.कृष्णा गजबे (आरमोरी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्हयात सन २०१६ मधील सिझन मध्ये पैसा अंतर्गत ग्रामपंचायतीमध्ये तेंदुपत्ता घटकांची विक्री करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, किती ग्रामपंचायतीमध्ये सदर विक्री प्रकीयेत अटी व शर्तीचे पालन करते वेळी तेंदुपत्ता विक्रीची रक्कम, रॉयल्टी व विक्रीकर टॅक्सची रक्कम मुदतीमध्ये भरली आहे,

(३) असल्यास, याबाबत चौकशीकरून कंत्राटदारांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (११-०२-२०१९) :** (१) खरे आहे.

शासन निर्णय क्रमांक: पेसा २०१२/ प्र.क्र.६५/ पं.रा.-२, दिनांक १७.१२.२०१५ अन्वये पेसा अंतर्गत पर्याय क्रमांक २ नुसार ग्रामसभेने स्वत: तेंदूपानाची विक्री करण्याचा पर्याय निवडून सन २०१६ तेंदु हंगामात ग्रामसभा/ग्रामपंचायत पातळीवर तेंदुपानाची तेंदु घटक तयार करुन विक्री केलेली आहे.
(२) एकुण ६१३ ग्रामसभेनी विक्री प्रक्रिया केली असून सदर ग्रामसभांना तेंदुपत्ता विक्रीची रॉयल्टी रक्कम मुदतीमध्ये प्राप्त झालेली असुन विक्रीकर भरण्यात आलेला नाही.

(३) ग्रामसभेनी कंत्राटदाराकडुन अटी व शर्तीचे पालन करीत मुदतीत रॉयल्टी रक्कम वसुल करण्यात आलेली आहे. परंतु प्रथम वर्ष असल्यामुळे व सदरची प्रक्रिया हंगामी स्वरुपाची असल्यामुळे वेळेअभावी ग्रामसभेनी विक्रीकर कंत्राटदाराकडून  वसुल करण्याकरिता टॅन व पॅन नंबर सादर न केल्यामुळे विक्री कर मुदतीमध्ये भरलेला नाही. चालू वर्षामध्ये टॅन व पॅन नंबर काढण्याकरीता निर्देश देण्यात आले आहेत. तसेच तेंदु संकलन व विक्री व्यवस्थापनासंदर्भात मार्गदर्शनपर पुस्तके ग्रामसभेला पुरविणेत आले आहेत.
(४) टॅन व पॅन नंबर ग्रामसभेनी काढून घेतलेले नसल्यामुळे विलंब झालेला आहे.

---

**शिवणी कोतळ गावात (ता.निलंगा, जि.लातूर) दलित महिलेस सरपंच पदापासून पाच वर्ष दूर ठेवण्यात आल्याबाबत**

**(८) ८५७६५ (०४-०९-२०१७) श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिवणी कोतळ गावात (ता.निलंगा, जि.लातूर) दलित महिलेस सरपंच पदापासून पाच वर्ष दूर ठेवण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सरपंच पद अनुसूचित जातीच्या महिलेसाठी राखीव असलेल्या या गावात संबंधीत महिला सन २०१२ मध्ये बिनविरोध सदस्य म्हणून निवडून आली असताना सरपंच निवडीच्या वेळी ती महिला गैरहजर होती हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-०२-२०१९) :** (१) हे खरे नाही.

(२) मौ.शिवणी कोतल ता.निलंगा, जि.लातूर येथील ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणूक २०१२ मध्ये श्रीमती आयतनबोणे मंगलबाई बालाजी या महिला अनुसूचित जमाती या राखीव प्रवर्गातून सदस्यपदी बिनविरोध निवडून आल्या होत्या.

सरपंच पद हे अनुसूचित जमाती (महिला) प्रवर्गासाठी राखीव असल्यामुळे सरपंच पदाच्या निवडी दरम्यान उक्त महिला सदस्य या विशेष बैठकीस हजर राहिल्या नाहीत. तसेच त्यांनी सरपंच पदासाठी नामनिर्देशन पत्र दाखल केलेले  नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उत्रे - निकमवाडी (ता.पन्हाळा,जि.कोल्हापूर) बंद रस्ता पूर्ववत सुरु करण्याबाबत**

**(९) ८५९२६ (११-०८-२०१७). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उत्रे - निकमवाडी (ता.पन्हाळा,जि.कोल्हापूर) हा पन्हाळगडावर जाण्यासाठीचा रस्ता सन १९७५ मध्ये करण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्ता पन्हाळगडावर जाण्यासाठी अत्यंत जवळचा रस्ता असून उत्रे ते पन्हाळगड अंतर फक्त ७ किमीचे असून सदर रस्ता बंद असल्याने लोकांना कोतोली-फाटा - वाघबीळ ते पन्हाळा असा लांबचा प्रवास करावा लागत आहे तसेच सदर रस्त्यात पावसाळ्यात दरडी कोसळत असल्याने सदर रस्ता पावसाळयात बंद होतो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रस्त्याची पाहणी केली आहे काय व त्यात काय आढळून झाले,

(४) असल्यास, त्यानुसार उत्रे-निकमवाडी रस्ता पूर्ववत सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१३-०२-२०१९) :** (१) या बाबतची दप्तरी नोंद उपलब्ध नाही.

(२) कोतोली फाटा वाघबीळ ते पन्हाळा हा रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीत येत असून सदर रस्त्यावर पावसाळ्यात दरड कोसळून रस्ता बंद झाल्याचे निदर्शनास आलेले नाही.

तथापि,कोतोली वाघवे गुडे तीन दरवाजा मार्गे पन्हाळा हा ६.०० कि.मी.चा रस्ता अवजड वाहतुक वगळता सोईस्कर व जवळचा आहे.

(३) व (४) राज्य मार्ग १९१ पासून उत्रे निकमवाडी ग्रामीण मार्ग क्र. ७३ ची पाहणी जिल्हा परिषदेमार्फत करण्यात आली असून या रस्त्याची लांबी १.०० कि.मी. आहे. या रस्त्याचा पृष्ठभाग मुरमी आहे. ही लांबी वन खात्याच्या अखत्यारीत असल्याने वन विभागाची परवानगी व अनुदान उपलब्धतेनंतर सदरचे काम हाती घेण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**श्रीगोंदा तालुक्यात (जि.अहमदनगर) घरकुलाची कामे मोठया प्रमाणात प्रलंबित असल्याबाबत**

**(१०) ८७७४८ (१८-०८-२०१७) श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीगोंदा (जि.अहमदनगर) तालुक्यात घरकुलाची कामे मोठया प्रमाणात प्रलंबित असल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

वि.स. ५४९ (९)

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-०२-२०१९) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सांगली जिल्ह्यातील प्रधानमंत्री घरकुल आवास योजनेंतर्गत सुरु असलेली घरकुल बांधकामे पाणी व वाळू टंचाईमुळे प्रलंबित असल्याबाबत**

**(११) ८८५९५ (०४-०९-२०१७). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाळवा, खानापूर, आटपाडी तालुक्यातील (जि. सांगली) अनेक गावात प्रधानमंत्री घरकुल आवास योजनेअंतर्गत सुरु असलेली घरकूल बांधकामे पाणी व वाळू टंचाईमुळे प्रलंबित असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वाळू व पाण्याची टंचाई दूर करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्रीमती पंकजा मुंडे (१३-०२-२०१९) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**औरंगाबाद जिल्ह्यातील १३१ व जालन्यातील १२२ अशा एकूण २४३ जि.प. शाळांकडे विदयुत देयकाची रक्कम थकीत असल्याबाबत**

**(१२) ८८८४२ (११-०८-२०१७). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्ह्यातील १३१ व जालन्यातील १२२ अशा एकूण २४३ जि.प. शाळांकडे विदयुत देयकाचे ३० लाख १३ हजार ५६५ रुपये थकीत असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे महावितरणने सदर शाळांची विदयुत जोडणी तोडल्यामुळे ई लर्निंग चे काम बंद पडल्यामुळे विद्यार्थ्याचे शैक्षणिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने निर्णय घेवून जि.प. फंड जिल्हा नियोजन समिती शासन आदीमार्फत निधी उपलब्ध करुन देवून सदर शाळांचे थकीत विदयुत देयके भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-०२-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, अंशत: खरे आहे.

औरंगाबाद जिल्हापरिषदेच्या काही शाळांनी सर्वशिक्षा अभियानाअंतर्गत तरतुदीतून विद्युत देयके अदा केलेली आहेत तर जालना जिल्हा परिषदेकडील काही शाळेवर सौर उर्जाची साधने उपलब्ध असल्यामुळे पर्यायी व्यवस्था झाली आहे.

(३) औरंगाबाद जिल्हा परिषदेकडून सन २०१६-२०१७ च्या अंदाजपत्रकात तरतुदीची मागणी करण्यात आली होती. तथापि, तरतुद प्राप्त झालेली नाही.

सर्व शिक्षा अभियान अंतर्गत शाळांना अनुदान दिले जाते. सदर अनुदानातून शाळेचे विज बील भरण्यात येते.

जालना जिल्हा परिषदेकडून लोकवर्गणीतूर सौर ऊर्जेची पर्यायी साधने उपलब्ध केलेली आहेत. त्यावर ई-लर्निग संच सुरु आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मंगळवेढा(जि.सोलापूर) तालुक्यात प्रधानमंत्री आवास घरकुल योजनेंतर्गत वंचित लाभार्थ्यांना घरकुलांचा लाभ मिळण्याबाबत

**(१३) ८८९७६ (११-०८-२०१७). श्री.भारत भालके (पंढरपूर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंगळवेढा (जि.सोलापूर) तालुक्यात प्रधानमंत्री आवास घरकुल योजनेंतर्गत वंचित लाभार्थ्यांना घरकुलांचा लाभ मिळावा यासाठी शासनाच्या सूचनेनुसार लाभार्थ्यांनी ग्रामपंचायत स्तरावर "ड" नमून्यात फॉर्म भरुन दिले असल्याचे माहे जानेवारी,२०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त अर्जाची छाननी करुन पात्र लाभार्थ्यांना घरकुलांचा लाभ देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१३-०२-२०१९) :** (१) हे खरे आहे.

(२) केंद्र शासनाने प्रपत्र -ड मधील कुटुंबांचा तपशील नोंद करण्यासाठी आवास + हे ॲप विकसित केले आहे. सदर आवास + ॲपच्या माध्यमातून सर्वेक्षण करण्यात येत असून शासनपत्र दि.१०.८.२०१८ अन्वये याबाबत सर्व क्षेत्रिय स्तरावर मार्गदर्शक सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही

---

**मानव विकास कार्यक्रम व महिला व बालकल्याण विभाग जिल्हा परिषद माध्यमातून अनुसुचित जाती व अनुसुचित जमातीच्या विद्यार्थीनींना सायकलचे वाटप करण्याबाबत**

**(१४) ८९८९१ (१२-०८-२०१७) श्री.विजय रहांगडाले (तिरोडा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोदिया जिल्हा परिषदेतंर्गत शासनाने मानव विकास कार्यक्रम व महिला व बालकल्याण विभाग जिल्हा परिषद माध्यमातून अनुसुचित जाती व अनुसुचित जमातीच्या विद्यार्थीनींना सन २०१६-१७ वर्ष होवूनही अद्यापपर्यंत सायकलचे वाटप झाले नसल्याचे दिनांक १३ एप्रिल,२०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास, त्यानुसार विद्यार्थीनींना सायकलीचे वाटप करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-०२-२०१९) :** (१) होय.

तथापि, याबाबतची कोणतीही तक्रार अथवा निवेदन दि. १३.४.२०१७ रोजी वा त्या सुमारास प्राप्त झालेले नाही.

(२) व (३) सन २०१६-१७ मध्ये सायकल वाटपासाठी अर्थसंकल्पीत केलेले रू. २५,९३,५००/- इतके अनुदान हे त्या आर्थिक वर्षात खर्ची न पडल्याने दि. २९.६.२०१७ रोजी जिल्हा परिषदेने सर्वसाधारण सभेचा ठराव घेऊन ही अखर्चित राहीलेली रक्कम सन २०१७-१८ वर्षात खर्च करण्याची मान्यता घेण्यात घेण्यात आली. त्यानुसार ७४१ गरजू विद्यार्थीना दि. २३.२.२०१८ च्या आदेशान्वये सायकल वाटप करण्यात आलेले आहे.

(४) सन २०१६-१७ मध्ये महिला व बालविकास समितीकडून पात्र लाभार्थींच्या अंतिम यादी प्राप्त न झाल्याने सन २०१६-१७ मध्ये या प्रयोजनासाठी अर्थसंकल्पीत करण्यात आलेली रक्कम रू. २५,९३,५००/- खर्ची पडली नाही.

---

**अकोला जिल्हा परिषदेच्या आजी/माजी अध्यक्षांवर अपात्रतेच्या कारवाईबाबत**

**(१५) ९१२६८ (२२-०८-२०१७). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्हा परिषदेच्या जलव्यवस्थापन व स्वच्छता समितीचे अध्यक्ष अर्थात पदसिद्ध जि.प.अध्यक्ष यांनी कासली ता.जि. अकोला येथील गाव तलावाच्या दुरुस्ती ठरावावर स्वाक्षरी न केल्याने जिल्हा परिषदेचे तत्कालीन आजी/माजी अध्यक्षांवर अपात्रतेची कारवाई करण्याचे, विभागीय आयुक्त अमरावती यांनी माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान आदेश दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कासली खु. व बु येथील पाण्याची टंचाई दूर करण्यासाठी स्थानिक तलावाची दुरुस्तीचा ठराव मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांनी मांडून ३७ लक्ष रुपये मंजूर करून निविदा काढून सुद्धा काम सुरु न केल्याने महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ च्या कलम २६७(अ) सदर प्रस्तावास मंजुरी तसेच कार्यावाहीस्तव स्थानिक लोकप्रतिनिधीनी विभागीय आयुक्त, अमरावती यांच्याकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार उक्त जिल्हा परिषदेचे आजि/माजी अध्यक्षांचे अपात्रते प्रकरणी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-०२-२०१९) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) या प्रकरणात सध्या जिल्हा परिषद किंवा प्रतिवादी यांचेकडून कोणत्याही स्वरूपाचा प्रस्ताव किंवा अर्ज प्राप्त नसल्याने शासनाद्वारे चौकशीचा प्रश्न उद्भवला नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**धारणी (जि.अमरावती) तालुक्यासाठी केंद्र आणि राज्य सरकारच्या इंदिरा आवास योजनेंतर्गत आलेला निधी केंद्राने परत मागविल्याबाबत**

**(१६) ९२६४९ (२२-०८-२०१७) श्री.प्रभुदास भिलावेकर (मेळघाट) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धारणी (जि.अमरावती) तालुक्यासाठी केंद्र आणि राज्य सरकारच्या इंदिरा आवास योजनेंतर्गत आलेला २५ कोटीचा निधी केंद्राने परत मागविल्याची माहिती माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,तालुक्यातील ३८९४ इंदिरा आवास योजनेचे लाभार्थी यापासून वंचित राहिले असून उक्त निधी परत जाण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, तालुक्यातील लाभार्थ्यांना सदरहू योजनेचे लाभ मिळावे याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१३-०२-२०१९) :** (१) हे खरे आहे.
(२) सन २०१५-१६ पासून इंदिरा आवास योजना ऑनलाईन करण्यात आल्यामुळे पंचायत समितीस्तरावरील अखर्चित निधी रु.२२.४४ कोटी दिनांक १८.४.२०१६ रोजी राज्य व्यवस्थापन कक्ष ग्रामीण गृहनिर्माण यांचेकडील State Nodel Account (SNA) मध्ये जमा करण्यात आला.

(३) सप्टेंबर, २०१७ पासून लाभार्थींना PFMS प्रणालीद्वारे निधी वितरीत करण्यात आला आहे. २२५२ लाभार्थ्यांना सद्य:स्थितीत FTO मार्फत सदरचा निधी वितरित करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**दुष्काळग्रस्तांच्या मदतीसाठी गोळा केलेला मदतनिधी अधिकाऱ्यांच्या दिरंगाईमुळे वाटपाविना पडून असल्याबाबत**

**(१७) ९३५९१ (०५-१०-२०१७). श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबादसह संपूर्ण मराठवाड्यातील दुष्काळग्रस्तांच्या मदतीसाठी जिल्हा परिषद संवर्गीय कर्मचारी संघटना तसेच विविध शिक्षक संघटनांचे पदाधिकारी, सदस्यांनी प्रत्येकी २०० रुपये याप्रमाणे गोळा केलेला तब्बल २१ लाख रुपयांचा मदतनिधी वाटपाविना पडून असल्याची बाब दिनांक २ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासकिय मदतीपेक्षा अन्य सामाजिक संघटनांची मदत दुष्काळग्रस्तांसाठी वेळेवर पोहोचली मात्र अधिकाऱ्यांच्या दिरंगाईमुळे ही रक्कम वित्त विभागाच्या बँक खात्यावर दीड वर्षापासून पडून आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार दुष्काळग्रस्तांसाठी गोळा केलेला मदतनिधी वाटपाविना पडून असलेल्या जबाबदार अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-०२-२०१९) :** (१) व (२) दुष्काळग्रस्त परिस्थिती पाहता तत्कालीन जिल्हा परिषद अध्यक्षा,औरंगाबाद यांनी सर्व कर्मचारी यांचे प्रतिनिधी व प्रशासकीय अधिकारी यांची दि.२०.२.२०१६ रोजी बैठक आयोजित केली. सदर बैठकीमध्ये अधिकारी यांचे एका दिवसाचे वेतन व प्रती कर्मचारी यांच्याकडून स्वेच्छेने रु.२००/- एवढी रक्कम जमा करण्याबाबत निर्णय घेण्यात आला. अशाप्रकारे मार्च, २०१६ ते जून, २०१७ या कालावधीमध्ये टप्प्याटप्याने रु.२४,०३,५१३/- एवढा संकलित झालेला निधी जिल्हा परिषदेच्या वित्त विभागाकडे जमा करण्यात आला.

संकलित झालेला निधी हा शासकीय निधी नसून सदरचा निधी मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांच्या नियंत्रणातील लेखाशिर्षामध्ये जमा करण्यात आलेला आहे. सदर निधी हा ऐच्छिकतेनुसार संकलित करण्यासाठी पाठपुरावा करण्यात आल्याने यामध्ये अधिकारी /कर्मचारी जबाबदार नाहीत.

(३) जिल्हा परिषदेचे अध्यक्ष तसेच सर्व कर्मचारी संघटना यांच्याशी विचारविनिमय करून दि.२४.७.२०१७,दि.१.१.२०१६ ते १०.७.२०१७ या कालावधीमध्ये औरंगाबाद जिल्हयातील शासकीय अनुदानास पात्र १५८ आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबास प्रत्येकी रु.१५,०००/- एवढी रक्कम धनादेशाद्वारे वितरीत करण्यात आलेली आहे.
(४) आचारसंहिता तसेच संकलित निधी जमा करण्यास वेळ लागला असल्याने निधी वाटपास विलंब झाला आहे.

---

**मोताळा (जि.बुलढाणा) तालुका बांधकाम उपविभाग बुलढाण्याला जोडण्याबाबत**

**(१८) ९६०५१ (२२-१२-२०१७) श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोताळा (जि.बुलढाणा) हा संपुर्ण तालुका बुलढाणा जिल्हा परिषद बांधकाम उपविभागास जोडलेला नसल्याने प्रशासकीय कामकाजाच्या दृष्टीने गैरसोईचा असल्याची बाब दिनांक १० ऑक्टोबर,२०१७ रोजी वा त्या सुमारास निर्देशनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संपुर्ण मोताळा तालुक्याचे कामकाज सुरळीत,सोईस्कर होण्याच्या अनुषंगाने बांधकाम उपविभाग बुलढाण्याला जोडण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १७ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद बुलढाणा यांना निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर निवेदनानुसार मोताळा हा संपुर्ण तालुका बांधकाम उप विभाग बुलढाण्याला जोडण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-०२-२०१९) :** (१) हे खरे नाही.
(२) होय.
(३) बांधकाम उप विभाग बुलढाणा व मलकापूर यांचे कार्यभाराचा (Work Load) विचार करता मोताळा तालुका बुलढाणा उप विभागास जोडणे सध्यातरी संयुक्तीक नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मराठवाडयात घरकुलांसाठी अनुदान देण्याबाबत**

**(१९) ९६७७६ (२२-१२-२०१७) श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), अॅड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बेघरासाठी मराठवाडयात ५८ हजार ९८ घरांना मंजूरी दिली परंतु फक्त ८७७ घरेच बांधून पूर्ण झाली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विभागातील उर्वरित घरकूलांसाठी द्यावयाच्या अनुदानाचा पहिला, दुसरा आणि तिसरा हप्ता न दिल्यामुळे ती घरकुलांचे बांधकाम थांबले आहे,हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास,याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार उर्वरित घरकुलांसाठी अनुदानाचा हप्ता तात्काळ देवून घरकुलांचे बांधकाम पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१३-०२-२०१९) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) मराठवाड्यातील आठ जिल्ह्यांसाठी सन २०१६-१७ मध्ये ५८०८५ एवढ्या लाभार्थींना ऑनलाईन मंजूरी देण्यात आली. त्यापैकी २८२०८ घरकुले पूर्ण झालेली आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## तुपूरवाडी-तेगीनहाळ (ता.गडहिंग्लज,जि. कोल्हापूर) या रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत

**(२०) ९६९२८ (२२-१२-२०१७) श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तुपूरवाडी-तेगीनहाळ (ता.गडहिंग्लज,जि. कोल्हापूर) या स्त्याचे काम सन १९७२ च्या दुष्काळात रोजगार हमी योजनेखाली करण्यात आले होते हा रस्ता महाराष्ट्र व कर्नाटक या दोन्ही राज्यांना जोडणारा महत्वाचा रस्ता आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या रस्त्याची दुरवस्था झाली असून रस्ता वाहतुकीस अयोग्य झाल्यामुळे रस्त्याची दुरुस्ती व खडीकरण करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २८ जुलै, २०१७ रोजी मा. सार्वजनिक बांधकाम मंत्री यांना विनंती केली आहे , हे ही खरे आहे काय,
(३) असल्या, सदर रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (११-०२-२०१९) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) प्रश्नांकित तुपरवाडी ते तेगिनहाळ हा रस्ता ग्रामीण मार्ग क्र. २५ असून जिल्हा परिषदेच्या अखत्यारीत आहे. सदर रस्त्यांची पाहणी जिल्हा परिषदेमार्फत करण्यात आली आहे.

या रस्त्याची एकूण लांबी ४.७०० कि.मी. असून त्यापैकी ०/०० ते १/२०० कि.मी. डांबरी पृष्ठभाग सुस्थितीत आहे. १/२०० ते ३/२०० कि.मी. खडी पृष्ठभाग व ३/२०० ते ४/७०० कि.मी. मुरमी पृष्ठभाग खराब झाला असून या रस्त्याची दुरुस्ती करणे आवश्यक आहे.

सदर रस्त्याच्या खराब लांबीतील रस्ता दुरुस्तीचे काम निधीच्या उपलब्धतेनुसार हाती घेण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### राज्यातील जिल्हा परिषदेच्या विशेष सभेबाबत

**(२१) ९८२३६ (२२-१२-२०१७). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जिल्हा परिषदेची विशेष सभा बोलविण्यासाठी जिल्हा परिषदेच्या सदस्यांपैकी किमान एक पंचामांश सदस्यांनी मागणी करण्याची अट राज्य शासनाने रद्द करुन त्याऐवजी आता विशेष सभेसाठी दोन पंचामांश सदस्यांनी लेखी मागणी करणे बंधनकारक करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निर्णयाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-०२-२०१९) :** (१) व (२) होय.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ मधील कलम १११ च्या पोट-कलम (३) मध्ये सुधारणेसाठीचे सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्र. ५५ हे विधानसभेत दि. ११ ऑगस्ट, २०१७ रोजी "महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) विधेयक, २०१७ (सन २०१७ चे महा.विधेयक क्र. ५५)" संमत झाले व महाराष्ट्र विधानपरिषदेत प्रलंबित होते.

राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे कामकाज चालू नसल्याने महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ मधील कलम १११ च्या पोट-कलम (३) मध्ये सुधारणांसाठी दि. ०७ ऑक्टोबर, २०१७ रोजी सन २०१७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्र. २१ प्रख्यापित करण्यात आला. तद्नंतर सदर अध्यादेशाचे अधिनियमात रुपांतर करण्यासाठी सन २०१७ च्या हिवाळी अधिवेशनात महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्र.७२ सादर करण्यात आले असता उक्त विधेयक महाराष्ट्र विधानसभेने संमत केले आहे.

महाराष्ट्र विधानपरिषदेमध्ये सदर विधेयक दि. २२ डिसेंबर, २०१७ रोजी मान्यतेसाठी सादर केले असता, त्यावर विस्तृत स्वरुपाची चर्चा होऊन विधेयकातील तरतूदींबाबत जिल्हा परिषदांचे मत मागविण्याचा निर्णय घेण्यात आला. त्या अनुषंगाने सर्व जिल्हा परिषदांचे मत शासन पत्र दि.१६ जानेवारी, २०१७ अन्वये मागविण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### लातूर जिल्हयातील ग्रामीण रस्त्याची झालेली दुरवस्था

**(२२) ९८५९९ (२२-१२-२०१७) श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्हयातील गोढाळा,कोष्ट्गाव,मुरुड अकोला गातेगाव मांजरी साखरा पाटी ते चीखुर्डा,मसला ते भोसा,हळदुर्ग ते लखनगाव,आदी ग्रामीण रस्ते अत्यंत खराब झाल्याने सदर

रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद लातूर ,कार्यकारी अभियंता जिल्हा परिषद बांधकाम लातूर यांच्याकडे सन २०१७ मध्ये निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्यांची शासनाने पाहणी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास,त्यानुसार रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी किती निधीची आवश्यकता असून रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (११-०२-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे. मुरुड अकोला ते गातेगांव हा रस्ता प्रमुख जिल्हा मार्ग दर्जाचा असून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीत आहे.

(२) सदर रस्त्यांची पाहणी जिल्हा परिषद लातूर व सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्यामार्फत करण्यात आली आहे. सदर रस्त्यांची दुरुस्ती करणे आवश्यक आहे.

(३) प्रश्नामध्ये खालील रस्त्यांचा समावेश आहे.

अ) गोढाळा-कोष्टगाव हा अवर्गीकृत रस्ता असल्याने त्यावर शासनाच्या योजनेतून काम करता येत नाही.

आ) मुरुड अकोला गातेगाव हा रस्ता प्रमुख जिल्हा मार्ग क्र. १३ चा भाग रस्ता असून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीत आहे.सदर रस्त्याच्या डांबरी पृष्ठभागातील खड्डे भरण्याचे रु. ३७.३७ लक्षचे काम पूर्ण करण्यात आले असून रस्ता वाहतुकीसाठी सुस्थितीत आहे. तसेच सदरील रस्त्यावरील ४/०० ते ६/०० कि.मी. लांबीतील सुधारणा करण्याचे रु.८०.०० लक्षचे काम मंजूर आहे.

इ) गातेगाव ते मांजरी हा ग्रामीण मार्ग क्र. ८० असून या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी रु.६४.०० लक्ष निधी आवश्यक आहे.

ई) साखरी पाटी ते चिखुर्डा रस्ता हा इतर जिल्हा मार्ग क्र. १२६ असून या रस्त्याचे काम मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेत मंजूर आहे.

उ) मसला ते भोसा हा रस्ता ग्रामीण मार्ग क्र. ४८ असून या रस्त्याची लांबी ३.०० कि.मी. आहे.त्यापैकी ०/०० ते १/७०० कि.मी. लांबी जिल्हा वार्षिक योजनेत मंजूर आहे. उर्वरीत लांबीच्या दुरुस्तीसाठी रु ४४.०० लक्ष खर्च अपेक्षित आहे.

ऊ) लखनगाव-हळदुर्ग ते रामा २३९ हा ग्रामीण मार्ग क्र. १० असून त्याची एकूण लांबी २.०० कि.मी. आहे. त्यापैकी ०/०० ते ०/५०० कि.मी. लांबी सुस्थितीत आहे. जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत सदर कामास रु. १९.०० लक्ष निधी प्राप्त असून उर्वरीत कामासाठी रु. १७.०० लक्ष खर्च अपेक्षित आहे.

वरील रस्त्यांची मंजूर लांबी वगळता उर्वरीत लांबीच्या दुरुस्तीची कामे जिल्हा परिषदेला विविध योजनांतर्गत प्राप्त निधी व निकषाच्या अधिन राहून टप्प्या-टप्प्याने प्रस्तावित करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बिलोली (जि.नांदेड) तालुक्यात पंतप्रधान आवास घरकुल योजनेच्या लाभापासून बहुसंख्य लाभार्थी वंचित असल्याबाबत**

**(२३) ९९३७१ (२६-१२-२०१७) श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बिलोली (जि.नांदेड) तालुकयात पंतप्रधान आवास घरकुल योजनेत गावपातळीवर ग्रामसभेत लाभधारकांच्या यादीचे वाचन न करताच परस्पर घरकुल मंजूर झाल्या या योजनेच्या लाभापासून बहुसंख्य लाभार्थी वंचित असल्याचे माहे सप्टेंबर,२०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेत अनेक गावात श्रीमंत लोकांना दुस-यांदा लाभ मिळाला आहे, तसेच सधन व श्रीमंत लोकांनी पदाचा गैरवापर करुन एकत्र कुटूंबास विभक्त दाखूवन घरकुले मंजूर केली आहेत याची शासनाने चौकशी करावी अशी मागणी वंचित राहिलेल्या लाभार्थ्यांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मागणीनुसार शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार प्रत्येक गावातील कुटूंबियांना या योजनेचा लाभ मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१३-०२-२०१९) :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) चौकशीचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**तिवसा ( जि. अमरावती ) तालुक्यात मुख्यमंत्री फेलोशिप योजना महाराष्ट्र व्हिलेज सोशल ट्रान्समिशन मिशन अंतर्गत येणाऱ्या ग्रामपंचायतींना अतिरिक्त विशेष उद्दीष्ट देण्याबाबत**

**(२४) ९९५२० (०४-०१-२०१८) ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तिवसा (जि. अमरावती) तालुक्यात मुख्यमंत्री फेलोशिप योजना महाराष्ट्र व्हिलेज सोशल ट्रान्समिशन मिशन अंतर्गत येणाऱ्या ग्रामपंचायतींना अतिरिक्त विशेष उद्दीष्ट देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मागणी करूनही अद्यापी या प्रकरणी कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, त्यानुसार मुख्यमंत्री फेलोशिप योजना महाराष्ट्र व्हिलेज सोशल ट्रान्समिशन मिशन अंतर्गत येणाऱ्या ग्रामपंचायतींना अतिरिक्त विशेष उद्दीष्ट देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (११-०२-२०१९) :** (१) नाही.

तिवसा (जि. अमरावती) तालुक्यात मुख्यमंत्री फेलोशिप योजना महाराष्ट्र व्हिलेज सोशल ट्रान्सफॉर्मेशन मिशनअंतर्गत येणाऱ्या ग्रामपंचायतींना अतिरिक्त विशेष उद्दीष्ट देण्याबाबत मा. स्थानिक लोकप्रतिनिधीनी संबंधीतांकडे वारंवार मागणी केली हे खरे आहे परंतु या प्रकरणी कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रावेर (जि.जळगाव) मतदारसंघातील जिल्हा परिषदेअंतर्गत सर्व रस्त्यांची झालेली दुरवस्था**

**(२५) १०१३२० (२६-१२-२०१७). श्री.हरीभाऊ जावळे (रावेर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रावेर (जि.जळगाव) मतदारसंघातील जिल्हा परिषदे अंतर्गत येत असलेल्या सर्व रस्त्याची दुरवस्था झाली असल्याचे माहे नोव्हेंबर-२०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,सदर रस्त्याची पाहणी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास,त्यानुसार सदर रस्त्याचे नूतनीकरण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१३-०२-२०१९) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) सदर रस्त्यांची पाहणी जिल्हा परिषदेमार्फत करण्यात आली असून रावेर विधानसभा मतदार संघाअंतर्गत इतर जिल्हा मार्ग व ग्रामीण मार्गाची एकूण लांबी ८१२.७५ कि.मी. आहे. त्यापैकी ३५४.५५ कि.मी.लांबी डांबरी पृष्ठभाग, २१०.७० कि.मी. लांबी खडी पृष्ठभाग व २४७.५० कि.मी.लांबी माती/मुरुमी पृष्ठभागाची आहे.

(३) रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी शासनाकडे उपलब्ध असलेल्या निधीचे वाटप रस्त्यांच्या लांबीच्या व मानव विकास निर्देशकाच्या प्रमाणात करण्यात येते .

सन २०१६-१७ मध्ये रस्ते व पुल दुरुस्ती कार्यक्रम लेखाशिर्ष ३०५४-२४१९ अंतर्गत जळगाव जिल्ह्यासाठी रु.७०३.३२ लक्ष तर सन २०१७-१८ मध्ये रु.४२४.०० लक्ष एवढा निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

जिल्हा परिषदेमार्फत विविध योजनांतर्गत उपलब्ध निधीमधून रस्त्यांच्या नूतनीकरणाची कामे करण्यात येत आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### गाउडदरा (ता.हवेली,जि.पुणे) येथील जिल्हा परिषदेच्या शाळेची झालेली दुरवस्था

**(२६) १०४८८३ (२८-०३-२०१८) श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गाउडदरा (ता.हवेली,जि.पुणे) येथील जिल्हा परिषदेच्या शाळेची भिंत कोसळून शाळेची दुरवस्था झाली असल्याची बाब माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,शाळेच्या जागेअभावी उन्हामध्ये वर्ग भरत असल्याने पालक विद्यार्थ्यांना शाळेत पाठवत नसल्याचे निदर्शनास आले आहे,हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,सदर शाळांची शासनाने पाहणी केली आहे काय व त्यानुसार सदर शाळांची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-०२-२०१९) :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) सर्व शिक्षा अभियान अंतर्गत जि.प.प्राथमिक शाळा, गाउडदरा येथे गट नं.१२ मध्ये ४ वर्ग खोल्यांची नवीन इमारतीचे बांधकाम करण्यात आले असून सदर इमारतीचा सन २०१५ अध्यापनासाठी वापर करण्यात येत आहे. जुन्या इमारतीचा वापर केला जात नसून ती पूर्णपणे बंद करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भभवत नाही.

---

### धुळे जिल्हयातील जिल्हापरिषद शाळांमधील तब्बल १९८ वर्ग खोल्या धोकादायक स्थितीत असल्याबाबत

**(२७) १०५८५७ (०५-०४-२०१८) श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), अॅड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे जिल्हयातील जिल्हापरिषद शाळांमधील तब्बल १९८ वर्ग खोल्या धोकादायक स्थितीत असल्याची माहिती शिक्षण विभागाने दिलेल्या माहितीनुसार माहे डिसेंबर,२०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या शाळेच्या वर्गाची शासनाने पाहणी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास,त्यानुसार उक्त शाळाच्या वर्ग खोल्यांच्या दुरुस्तीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-०२-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) होय, याबाबत सर्व गटशिक्षणाधिकारी व सर्व उपअभियंता (बांधकाम उपविभाग) यांची आढावा बैठक घेऊन जिल्हा परिषद शाळांच्या जुन्या इमारतींचा सर्वे करुन, त्यांची संयुक्त पहाणी करुन अहवाल सादर केला आहे. सदर अहवालानुसार मोडकळीस आलेल्या सर्व वर्ग खोल्या इमारतींचे निर्लेखनासाठी ७७ प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करण्यात आले आहेत. उर्वरित १२१ वर्गखोल्या दुरुस्तीसाठी व वर्गखोल्या बांधकामासाठी अंदाजपत्रके तयार करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे वाकण-जाधववाडी-खांबेश्वरवाडी-रोहिदासवाडी (ता.पोलादपूर, जि.रायगड) या रस्त्याचे काम पूर्ण करण्याबाबत**

**(२८) १०६१८७ (२८-०३-२०१८) श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे वाकण-जाधववाडी-खांबेश्वरवाडी-रोहिदासवाडी (ता.पोलादपूर, जि.रायगड) या ९०० मीटर लांबीच्या रस्त्यापैकी वाकण-जाधववाडी ते खांबेश्वरवाडी हा ग्रामा-८३ या ६०० मीटर लांबीच्या रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरणाचे काम ३०५४ रस्ते व पूल दुरुस्ती परिरक्षण कार्यक्रमांतर्गत मंजूर असून सदर रस्त्याचे मजबुतीकरण व खडीकरणांसह डांबरीकरण करण्यासाठी या भागातील ग्रामस्थांनी मा.ग्रामविकास मंत्री/मा.ग्रामविकास राज्यमंत्री, जिल्हाधिकारी,रायगड यांना प्रत्यक्ष भेटून माहे ऑगस्ट,२०१७ मध्ये वा त्यादरम्यान अर्ज/निवेदन सादर केली असनूही अद्यापपर्यंत कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,
(२) तसेच उर्वरित ३०० मीटर लांबीच्या खांबेश्वरवाडी क्र.१ ते रोहिदासवाडी या रस्त्याच्या मातीकाम, खडीकरण व डांबरीकरण कामासाठी लागणारा ९ लक्ष रुपये निधी उपलब्ध करुन देणार आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार उक्त रस्त्याच्या कामांसाठी निधी देण्यासह तात्काळ रस्त्याचे काम पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (११-०२-२०१९) :** (१) हे खरे नाही.
वाकण जाधववाडी- खांबेश्वरवाडी असा रस्ता अस्तित्वात असून हा ग्रामीण मार्ग क्र. ८६ आहे. या ६०० मीटर लांबीच्या रस्त्याचे डांबरीकरणाचे काम माहे एप्रिल २०१७ मध्ये पूर्ण करण्यात आले आहे.

(२) व (३) खांबेश्वरवाडी ते रोहिदासवाडी पर्यत ३०० मीटर लांबीचा रस्ता हा योजनाबाहय रस्ता असल्याने त्यावर शासनाच्या योजनांमधून निधी उपलब्ध करुन देता येत नाही. तथापि स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत लोकप्रतिनिधींनी काम सुचविल्यास सदर काम जिल्हा परिषदेला करणे शक्य होईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### पंचायत समिती सदस्य संघर्ष समिती मराठवाडा विभाग यांच्या प्रलंबित मागण्याबाबत

**(२९) १०६६६९ (०९-०४-२०१८). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सत्तेचे विकेंद्रीकरण झाले नसल्याने पंचायत राज संकल्पना अस्तित्वात येवूनही पंचायत समित्यांना पुरेसा निधी, अधिकार नसल्याने ग्रामीण भागाचा विकास खुंटत असल्याबाबत पंचायत समिती सदस्य संघर्ष समिती मराठवाडा विभाग यांनी त्यांच्या ११ मागण्यांचे निवेदन शासनास दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मागण्यांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-०२-२०१९) :** (१) होय.
(२) व (३) सदर निवेदनातील मागण्या या मंत्रालयातील विविध प्रशासकीय विभागांशी संबंधित असल्याने या मागण्यांवर तात्काळ कार्यवाही करण्याबाबत संबंधित विभागांना कळविण्यात आलेले आहे.

---

### अमरावती जिल्हयाच्या ग्रामीण भागातील रस्त्याची झालेली दुरवस्था

**(३०) १०७००८ (०५-०४-२०१८). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती जिल्हयाच्या ग्रामीण भागातील जवळपास २ हजार किलोमीटरच्या रस्त्याची दुरवस्था झाली असून जिल्हा नियोजनाकडून वाढीव निधी न मिळाल्याने रस्ते विकासाची कामे प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्त्याची शासनाने पाहणी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास,त्यानुसार रस्ता विकासाची कामे करण्यासाठी निधी मिळण्यासह रस्ता दुरुस्त करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१३-०२-२०१९) :** (१) हे खरे नाही.
(२) जिल्हा परिषदेमार्फत सदर रस्त्यांची पाहणी करण्यात आली आहे.
(३) अमरावती जिल्ह्यातील इतर जिल्हा मार्ग व ग्रामीण मार्गांसाठी जिल्हा वार्षिक योजना सर्वसाधारण सन २०१७-१८ करिता लेखाशिर्ष ३०५४-२०१६ मध्ये रु. १५.०० कोटी व ५०५४-४१५७ या लेखाशिर्षांतर्गत रु. २०.०० कोटी निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**तेलकुडगाव (ता.नेवासा, जि.अहमदनगर) येथील खरे लाभार्थी घरकूलापासून वंचित असल्याबाबत**

**(३१) १०७८७४ (०९-०४-२०१८) श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तेलकुडगाव (ता.नेवासा, जि.अहमदनगर) येथील खरे लाभार्थी घरकूलापासून वंचित असल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, त्यानुसार लाभार्थ्यांना घरकूल योजनेचा लाभ देण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१३-०२-२०१९) :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर जिल्हयातील इंदिरा आवास योजनेची घरकुलांची कामे प्रलंबित असल्याबाबत**

**(३२) १०८१७९ (२८-०३-२०१८). श्री.बबनराव शिंदे (माढा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर जिल्ह्यामध्ये सन २०१३-१४ या वर्षामध्ये इंदिरा आवास योजनेंतर्गत घरकुल बांधण्यास शासकीय मंजूरी देऊनही अद्यापपर्यंत घरकुलांची कामे सुरु झालेली नाहीत, हे खरे आहे काय,
(२)असल्यास, तालुकानिहाय मंजूरीची संख्या किती आहे व अद्यापपर्यंत कामे सुरु न झाल्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास,याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले,
(४) असल्यास, त्यानुसार मंजूरी दिलेल्या घरकुलांची कामे विहीत कालावधीत पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१३-०२-२०१९) :** (१) हे खरे नाही.

सन २०१३-१४ या वर्षामध्ये सोलापूर जिल्ह्यास इंदिरा आवास योजना अंतर्गत १४८४ घरकुलांचे उद्दीष्ट प्राप्त झाले होते. त्यापैकी सर्व घरकुलांना मंजूरी देणेत आली असून १४८१ घरकुलांचे बांधकाम पूर्ण झालेले आहेत.

(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**परभणी जिल्ह्यातील प्रधानमंत्री आवास योजनेबाबत**

**(३३) १०९८४६ (०३-०४-२०१८) डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.विजय भांबळे (जिंतूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्ह्यातील प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत नोंदणी झालेल्या ६ हजार ५६ लाभार्थ्यांपैकी केवळ ३०७ घरकुलांचे काम पूर्ण झाली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१७-१८ या वर्षात ६८२ घरे बांधण्याचे उद्दीष्ट असतांना अद्याप एकाही घरकुलाचे काम पूर्ण झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, परभणी जिल्ह्यातील प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत घरकुलाची कामे तात्काळ पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्रीमती पंकजा मुंडे (१३-०२-२०१९) :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) परभणी जिल्ह्यात प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत घरकूल बांधकामास गती देण्याच्या अनुषंगाने लाभार्थी समवेत तालुकास्तरावर समन्वय साधून घरकुलाची कामे गतीने पूर्ण करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**निरा (जि.पुणे) येथील पंतप्रधान आवास योजनेसाठी ग्रामीण भागातील ५०० चौ.फुटाचे अतिक्रमण नियमीत करणे किंवा पुर्नवसन करण्याबाबत**

**(३४) ११०४४७ (०३-०४-२०१८). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निरा (जि.पुणे) येथील पंतप्रधान आवास योजनेसाठी ग्रामीण भागातील ५०० चौ.फुटाचे अतिक्रमण नियमीत करणे किंवा पुर्नवसन करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे परंतु त्याची अंमलबजावणी अदयाप सुरु करण्यात आली नसल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासन निर्णयाची अमंलबजावणी लवकारात लवकर सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्रीमती पंकजा मुंडे (११-०२-२०१९) :** (१) हे खरे नाही.
(२) सर्वांसाठी घरे २०२२ या धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी ग्रामीण भागातील दि.१.१.२०११ पूर्वीचे ५०० चौ. फुटांचे शासकीय जमिनीवरील निवासी प्रयोजनासाठी केलेली अतिक्रमणे नियमानुकूल करण्याच्या धोरणात सुधारणा करण्याबाबतचा निर्णय दि.१६.२.२०१८ च्या शासननिर्णयान्वये घेण्यात आलेला आहे. त्यानुसार सर्वेक्षण करण्यात आले असता असे निदर्शनास आले आहे की, निरा (जि. पुणे) ग्राम पंचायतीच्या कार्यक्षेत्रामध्ये शासन मालकीची जागा उपलब्ध नाही तसेच गायरान क्षेत्रही उपलब्ध नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सांगली जिल्हयातील (ता. शिराळा) जिल्हा परिषदेच्या अंतर्गत रस्त्यासाठी संपादीत करण्यात आलेल्या जमिनीचा मोबदला शेतक-यांना मिळण्याबाबत

**(३५) १११६४४ (०६-०४-२०१८) श्री.शिवाजीराव नाईक (शिराळा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांगली जिल्हयातील (ता. शिराळा) जिल्हा परिषदेच्या अखत्यारित असलेल्या मंगळूर शिंदेवाडी हद्दीतील गट नं. ५० एकूण क्षेत्र ४ हेक्टर ३५ आर क्षेत्र पैकी अंदाजे ० हेक्टर १२ आर क्षेत्र जमिन रस्त्यामध्ये बाधित झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संबंधित बाधित शेतकरी जमिनीचा मोबदला मिळण्यासाठी शासनाकडे वारवांर मागणी करीत असूनही व स्थानिक लोकप्रतिनिधी त्याचा पाठपुरावा करित असूनही अद्यापी संबंधित शेतक-यांना जमिनीचा मोबदला मिळाला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार संबंधित बाधित शेतक-यांना जमिनीची नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत?

**श्रीमती पंकजा मुंडे (१३-०२-२०१९) :** (१) हे खरे नाही.
रस्ते विकास योजना आराखडा सुची १९८१-२००१ मध्ये इ.जि.मा. क्र. ११ व रस्ते विकास योजना आराखडा सुची २००१-२०२१ प्रमाणे इ.जि.मा.क्र. १० एकूण लांबी ९.६० कि.मी. लांबीचा रस्ता पूर्वीपासूनच अस्तित्वात आहे.
(२) श्री.पांडुरंग शेणवी, मु.पो.मंगरुळ-शिंदेवाडी ता.शिराळा यांनी जमिनीचा मोबदला मिळणेबाबत मागणी केली आहे, परंतू रस्ता पुर्वीपासूनच अस्तित्वात असल्याने कोणत्याही प्रकारची रस्त्याची नवीन आखणी केलेली नाही. त्यामुळे भूसंपादन करुन मोबदला देण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(३) जिल्हा परिषदेमार्फत रस्त्याची पाहणी करण्यात आली असून पूर्वीपासून अस्तित्वात असलेल्या रस्त्यावर डांबरीकरणाचे काम केलेले आहे. कोणत्याही प्रकारची रस्त्याची नवीन आखणी करुन काम केलेले नाही. त्यामुळे जमिनीची नुकसान भरपाई देण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे जिल्हा परिषदेची मुलींना मोफत सायकल वाटप करण्याची योजना अयशस्वी झाल्याबाबत

**(३६) ११२००२ (११-०४-२०१८) श्री.राहूल कुल (दौंड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण विभागाकडून शालेय मुलींना पुरविण्यात येणाऱ्या सायकलची योजना अयशस्वी झाली असून या योजनेचा निधी इतरत्र वळविण्यात आला असल्याची माहिती दिनांक ७ डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विद्यालयापासून दूर अंतरावर राहणाऱ्या शालेय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनींच्या शिक्षणावर परिमाण होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार सायकलची योजना पुनश्च सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-०२-२०१९) :** (१) होय.

(२), (३) व (४) पुणे जिल्हा परिषदेच्या महिला व बाल कल्याण विभागाला इयत्ता ५ वी ते ७ वी तील शिष्यवृत्ती/ प्राविण्य मिळविलेल्या मुलींना सायकल वाटप करणे या योजनेखाली सन २०१७-१८ मध्ये रु.३.२५ कोटी एवढी तरतूद करण्यात आली होती. याच प्रयोजनार्थ शिक्षण विभागामध्येसुध्दा तरतूद उपलब्ध असल्याने जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेने दि.१२.७.२०१७ रोजी ठराव करून जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ च्या कलम १३८ (२) अन्वये व शासन निर्णय ग्रामविकास विभाग क्र.झेडपीए २०१६/प्र.क्र.५६/वित्त-९, दि.७ ऑक्टोंबर,२०१७ मधील तरतूदीनुसार प्राप्त झालेल्या अधिकारात रु.३.२४ कोटी इतका निधी महिला व बाल विकास विभागाअंतर्गत १) बहूउद्देशीय शिलाई मशीन पुरविणे (DBT) २) कुपोषित बालकांना आहार पुरविणे या योजनांकडे वर्ग केलेला आहे.

सन २०१७-१८ मध्ये जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाकडून दि.२७.३.२०१८ च्या आदेशान्वये ५५० विद्यार्थी व विद्यार्थींना सायकल पुरविण्याचा आर्थिक लाभ देण्यात आलेला आहे. त्यामुळे दूर अंतरावर राहणाऱ्या शालेय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थीनीच्या शिक्षणावर परिणाम झालेला नाही.

---

## हिंगोली जिल्ह्यामध्ये घरकुल योजनेच्या यादीत बनावट नावे दाखवून केलेला गैरव्यवहार

**(३७) ११२५५१ (०९-०४-२०१८) श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्ह्यामध्ये घरकुल योजना अयशस्वी झाली असल्याने घरकुल लाभार्थ्यांना घरकुल मिळणार नसल्याचे माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे,

हे खरे आहे काय,
(२) तसेच या योजनेच्या यादीमध्ये बनावट नाव दाखवले असुन गरजू लाभार्थ्यांचे नाव यादीत आले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१३-०२-२०१९) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विविध आवास योजनेची प्रभावीपणे अंबलबजावणीसाठी बाह्य यंत्रेणेकडून रुजू झालेल्या अभियंत्यांना नियमित करण्याबाबत**

**(३८) ११४०७९ (०९-०४-२०१८) श्री.चरण वाघमारे (तुमसर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विविध आवास योजनेची प्रभावीपणे अंबलबजावणी साठी बाह्य यंत्रेणेकडून रुजू झालेल्या अभियंत्यांना सेतू समिती मार्फत नियमित करण्याकरिता स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.ग्रामविकास मंत्री यांना दिनांक २५ डिसेंबर,२०१७ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,सदर निवेदनानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाचे कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१३-०२-२०१९) :** (१) हे खरे आहे.
(२) केंद्र शासन पुरस्कृत व राज्य शासन पूरस्कृत ग्रामीण घरकुल योजनांतर्गत गृह निर्माण अभियंत्यांची नियुक्ती बाह्य यंत्रणेकडून तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पध्दतीवर करण्यात येत असल्याने सेतु समितीमार्फत त्यांना नियमित करता येणे शक्य नाही असे संचालक राज्य व्यवस्थापन कक्ष- ग्रामीण गृहनिर्माण यांच्या दि.२४.४.२०१८ रोजीच्या पत्रान्वये लोकप्रतिनिधी यांना कळविण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**हिंगोली विषेश घटक योजना व आदिवासी उपाययोजनेंतर्गत देयके प्रलंबित असल्याबाबत**

**(३९) ११४५७० (०७-०४-२०१८). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

वि.स. ५४९ (२८)

(१) हिंगोली विषेश घटक योजना व आदिवासी उपाययोजनेंतर्गत सन २०१६-१७ या वर्षातील देयके पंचायत समिती स्तरावरुन जिल्हा परिषेदेकडे मागील काही महिन्यापासून प्रलंबित असून त्यांत १०७ लाभार्थ्यांचा समावेश आहे देयके मिळण्यासाठी जि.प.सदस्य यांनी जि.प. मुख्य कार्यकारी अधिका-यांना निवेदन दिले आहे,हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनानुसार प्रलंबित देयके तात्काळ देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१३-०२-२०१९) :** (१) व (२) होय.

सन २०१६-१७ मध्ये विशेष घटक योजना (डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना) व आदिवासी उपयोजना मधील निवड झालेल्या लाभार्थ्यांना त्याची देयके जिल्हा स्तरावरून अदा करावयाच्या मार्गदर्शक सूचना कृषि आयुक्तलयाने दि.३.८.२०१७ च्या पत्रान्वये सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दिलेल्या आहेत. त्यानुसार सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात विशेष घटक योजनेअंतर्गत हिंगोली जिल्हयातील एकूण ५ तालुक्यामधून १०७ लाभार्थ्यांची देयके प्राप्त झाली होती. त्यापैकी पात्र १०३ लाभार्थ्यांची रक्कम दि.२५.८.२०१८ रोजी धनादेशाव्दारे त्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात आलेली आहे. उर्वरीत ४ लाभार्थ्यांच्या देयकांत त्रुटी आढळल्याने व त्या त्रुटींची पूर्तता न केल्याने सदर देयके तालुका स्तरावर परत पाठविण्यात आलेली आहेत.

डॉ. सतिश यशवंत पाचपूते,जिल्हा परिषद सदस्य,हिंगोली यांनी दि.१८.१.२०१८ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,हिंगोली यांना विशेष घटक योजना व आदिवासी उपाययोजना यांची देयके पुर्वीप्रमाणे पंचायत स्तरावर पारीत करण्याबाबत निवेदन दिलेले आहे.

कृषि आयुक्तालय,पुणे यांनी दि.२६.२.२०१८ च्या पत्रान्वये उपरोक्त योजनांची देयके पुर्वीप्रमाणे पंचायत समिती स्तरावरून पारीत करून लाभार्थ्यांच्या खाती जमा करून रक्कम जमा करण्याचे निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार पुढील देयके पंचायत समिती स्तरावरून अदा करण्यात आलेली आहेत.

आदिवासी उपाययोजने अंतर्गत एकही देयक प्राप्त झालेले नाही.

(३) विशेष घटक योजनेअंतर्गत प्राप्त झालेली देयके ही दि.५.१२.२०१७ ते दि.२१.१२.२०१७ या कालावधीतील आहेत. प्रात्र लाभार्थ्यांची सदर देयके मंजूर करून त्यांच्या बँक खात्यावर दि. २५.१.२०१८ रोजी रक्कम जमा करण्यात आलेली आहे. त्यामुळे लाभार्थ्यांच्या रक्कम जमा करण्यास विलंब झालेला नाही.

**मु पो राजना पूर्णा (ता. चांदूर बाजार, जि.अमरावती) येथील पंचायत समितीने तयार केलेल्या इंग्रजी यादीत नाव नसल्याने घरकुलाच्या लाभापासून लाभार्थी वंचित राहिल्याबाबत**

**(४०) ११५३५० (०७-०४-२०१८) श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीमती सुभद्राबाई अंबादास अकोलकर यांचे मु पो राजना पूर्णा (ता. चांदूर बाजार,जि.अमरावती) येथील पंचायत समितीने तयार केलेल्या इंग्रजी यादीत नाव नसल्याने घरकुलाच्या लाभापासून वंचित राहिल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास,त्यानुसार श्रीमती सुभद्राबाई अंबादास अकोलकर यांचे पंचायत समितीने तयार केलेल्या इंग्रजी यादीत नाव घेवन घरकुल योजनेचा लाभ तात्काळ देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१३-०२-२०१९) :** (१) व (२) सामाजिक, आर्थिक, जात सर्वेक्षण-२०११ च्या माहितीच्या आधारे केंद्राकडूनGenerated Priority List (GPL) ची यादी आवाससॉफ्टवर राज्याला प्राप्त होते. सदर GPL यादीमध्ये समाविष्ट असलेल्या पात्र कुटुंबाला प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) चा लाभ दिला जातो. सदर यादीमधील लाभार्थ्यांना ग्रामसभेने मान्यता दिल्यानंतर जिल्हास्तरीत समितीकडून कायमस्वरुपी प्रतिक्षायादी तयार करुन त्यानुसार लाभ दिला जातो. श्रीमती सुभद्राबाबई अंबादास अकोलकर, जि. अमरावती यांचे नांव GPL च्या यादीमध्ये समाविष्ट नसल्याचे आढळून आले आहे.

(३) ज्या पात्र कुटुंबाच्या नावाचा समावेश GPL मध्ये नाही त्या पात्र कुटुंबाला घरकुलाचा लाभा देण्यासाठी प्रपत्र-ड तयार करण्यात येत आहे. त्यानुसार श्रीमती सुभद्राबाई अंबादास अकोलकर, जि. अमरावती यांच्या नांवाचा समावेश प्रपत्र-ड मध्ये करण्यात आला असून पुढील कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जुनी जव्हार ( जि.पालघर ) ग्रामपंचायत हददीतील कशिवली नं २ येथील रहिवाशी व ४ लाभार्थ्यांनी घरकूल मंजूर करुन अनुदान परस्पर घेतल्याबाबत**

**(४१) ११५८०९ (०७-०४-२०१८) श्री.अमित घोडा (पालघर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जुनी जव्हार ( जि.पालघर ) ग्रामपंचायत हददीतील कशिवली नं २ येथील रहिवाशी गोविंद भाऊ भुसारा व त्यांच्या सोबत ४ लाभार्थी असे एकूण ५ लाभार्थ्यांचे घरकूल मंजूर करुन अनुदान परस्पर काढून घेतल्याची बाब नुकतीच माहे जानेवारी,२०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असलयास, सन २०१७-१८ मध्ये जुनी-जव्हार ग्रामपंचायतीपैकी कशिवली नं २ येथील सुशिला रविंद्र भोये,सुरेश मावंजी भोय, गोविंद भाऊ भुसारा, दशरथ रामा चौधरी व सुरेश रामा चौधरी या पाच लाभाथ्र्याना इंदिरा आवास व पंतप्रधान आवास योजनेतून गोविंद भाऊ भुसारा व दशरथ रामा चौधरी या दोघांना घरकुल योजनेचा लाभ देऊन घरकुल पूर्ण करुन देण्यात आल्याची दप्तरी नोंद करण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त दोन्ही लाभार्थ्यांना प्रत्यक्षात घरकुल योजनेचा लाभच मिळालेला नसल्याची लेखी तक्रार करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व तदनुसार दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१३-०२-२०१९) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) हे खरे आहे.
तथापि, श्री.गोविंद भाऊ भुसारा यांचे वडील कै.श्री.भाऊ लासु भुसारा यांना सन २००८-०९ यावर्षी इंदिरा आवास योजनेतंर्गत लाभ देण्यात आला आहे. त्यांच्या निधनानंतर मुलगा म्हणून श्री.गोंविद भुसारा यांना घरकुलाचे अनुदान वर्ग करण्यात आले आहे व श्री.दशरथ रामा चौधरी यांना समाज कल्याण विभागाकडील योजनेतून घरकुल लाभ देण्यात आले आहे. श्री.सुरेश मावंजी भोये व श्री.सुरेश रामा चौधरी यांचे पक्क घर असल्याकारणाने ते घरकुलाच्या लाभासाठी अपात्र ठरले आहे. तसेच श्रीमती सुशिला रविंद्र भोये यांचे नाव SEC-२०११ च्या यादीमध्ये नसल्याने त्यांना प्रधानमंत्री आवास योजनेचा लाभ देण्यात आलेला नाही. त्यांचे नाव प्रपत्र -ड मध्ये घेण्यात आलेले आहे.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मालवण ( जि. सिंधुदुर्ग ) तालुक्यातील मसुरे - डांगमोडे ग्रामपंचायतीचे विभाजन करून आंगणेवाडी - बीळवस - भोगलेवाडी अशा नवीन स्वतंत्र ग्रामपंचायती निर्माण करण्याबाबत**

**(४२) ११६६७४ (३०-०७-२०१८) श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मालवण ( जि. सिंधुदुर्ग ) तालुक्यातील मसुरे - डांगमोडे ग्रामपंचायतीचे विभाजन करून आंगणेवाडी - बीळवस - भोगलेवाडी अशा नवीन स्वतंत्र ग्रामपंचायत निर्माण करण्यात यावी अशी मागणी तेथील ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग जिल्हा, अध्यक्ष जिल्हापरिषद सिंधुदुर्ग, मा. पालकमंत्री सिंधुदुर्ग जिल्हा आदींकडे दिनांक २३ ऑक्टोबर,२०१७ रोजी व तत्पूर्वी मागील १ वर्षापासून सातत्याने लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,सदरहू मागणीच्या अनुषंगाने जिल्हापरिषद, सिंधुदुर्ग यांनी दिनांक २७ मार्च, २०१८ रोजीच्या मासिक सभेत ठराव पारित करून आयुक्त विभाग यांच्याकडे मंजुरीसाठी सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आंगणेवाडी - बीळवस - भोगलेवाडी अशा नवीन स्वतंत्र ग्रामपंचायत निर्माण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१८-०२-२०१९) :** (१), (२) व (३) मालवण (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील ग्राम पंचायत मसुरे-डांगमोडे चे विभाजन करुन आंगणेवाडी, बिळवस, भोगलेवाडी आणि देऊळवाडा खेरवंद हया नवीन स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करण्याबाबतचा प्रस्ताव विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचेमार्फत दिनांक १८ जुलै, २०१८ रोजीच्या पत्रान्वये शासनास प्राप्त झाला होता.

शासन निर्णय क्र.व्हीपीएम २६०३/प्र.क्र. १५४४/पं.रा.४ (२२) दिनांक १२ फेब्रुवारी, २००४ तसेच, शासन निर्णय क्र.व्हीपीएम २०११/प्र.क्र.१९१/ पंरा-४, दिनांक ०४ मार्च, २०१४ मधील सूचना विचारात घेऊन ग्रामपंचायत स्थापनेकरीता भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २४३ च्या खंड (छ) व महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम (सन १९५९ चा अधिनियम ३)कलम ४ अन्वये गाव जाहीर करण्यात येते.

त्यानुषंगाने मसुरे-डांगमोडे ग्रामपंचायतीचे विभाजन होवून मर्डे, बिळवस व देऊळवाडा ही स्वतंत्र गावे असल्याबाबतची दिनांक ०२ नोव्हेंबर, २०१८ रोजी राजपत्रात प्रसिध्द करण्यात आलेली अधिसूचना दिनांक १२ नोव्हेंबर, २०१८ रोजीच्या पत्रान्वये सर्व संबंधितांकडे पाठविण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**ग्रामपंचायत बारवई हद्दीत ( ता.पनवेल, जि. रायगड ) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण या संस्थेकरिता संपादीत केलेल्या गायचरण जमिनीचा कर संस्थेकडून वसूल करण्याबाबत**

**(४३) ११७४५८ (२०-०७-२०१८). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ग्रामपंचायत बारवई हद्दीत (ता.पनवेल, जि. रायगड) सन १९८९ पासून महाराष्ट्र जीवन प्राधिकरण या संस्थेसाठी ग्रामपंचायतीच्या मालकीची गायचरण जमिन संपादित केली असून आजपर्यंत घरपट्टी भरणा केला नसल्याबाबत वारंवार संबधित प्राधिकरणाच्या पनवेल येथील कार्यालयास पत्रव्यवहार करुनही आजपर्यंत घरपट्टी भरणा केला नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, त्यानुसार सदर प्राधिकरणास तात्काळ घरपट्टी भरणा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१८-०२-२०१९)** : (१), (२), (३) व (४) ग्रामपंचायत बारवई ता. पनवेल, जि. रायगड हद्दीतील सर्व्हे क्रमांक ५४ ही गायचरण जमीन महाराष्ट्र जीवन प्राधिकरण या संस्थेकरिता सन १९८९ पासून संपादित केलेली आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने त्याठिकाणी जलशुद्धीकरण केंद्र व पाणी साठवण टाक्या बांधल्या असून त्यापैकी काही बांधकामे नवी मुंबई महानगर पालिकेस कायम स्वरूपी हस्तांतर करण्यात आलेल्या आहेत.

सदर प्राधिकरणास ग्रामपंचायतीमार्फत कर आकारणी केली असून वसुलीसाठी कलम १२९ अन्वये रिट नोटिसा देण्यात आलेल्या आहेत.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने जिल्हा परिषद रायगड यांच्याकडे कर माफीबाबत अपिल सादर केले आहे.

---

**उमरगा ते फलसिंग नगर (पाटील तांडा) (ता.उमरगा, जि.लातूर) रस्ता तयार करण्याबाबत**

**(४४) ११८७४९ (२४-०७-२०१८) श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उमरगा ते फलसिंग नगर (पाटील तांडा) (ता.उमरगा, जि.लातूर) असा रस्ता तयार करुन मिळण्याबाबत स्थानिक नागरीकांनी मा.मुख्यमंत्री, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद लातूर यांनी दिनांक १२ मे,२०१८ रोजी वा त्यासुमारास निवेदने देऊन मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,सदर निवेदनानुसार सदर रस्ता तयार करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१३-०२-२०१९)** : (१) होय हे खरे आहे. तथापि, सदर रस्ता लातूर जिल्हा परिषद अंतर्गत येत नसून उस्मानाबाद जिल्हा परिषदेअंतर्गत येतो.

(२) उस्मानाबाद जिल्हा परिषदे अंतर्गत ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्ग रस्त्यांची एकूण लांबी ४८७६.६० कि.मी. इतकी आहे.

शासन निर्णयातील तरतुदीनुसार तालुक्यातील रस्त्यांची सूची PCI च्या प्राधान्यक्रमानुसार तयार करण्यात येते.

सदर रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी शासनाकडे उपलब्ध असलेल्या निधीचे वाटप रस्त्यांच्या लांबीच्या व मानव विकास निर्देशकाच्या प्रमाणात करण्यात येते .

रस्ते, पूल दुरुस्ती व परीरक्षण या कार्यक्रमा अंतर्गत सन २०१६-१७ या आर्थिक वर्षासाठी उस्मानाबाद जिल्हा परिषदेस रु.८१५.९२ लक्ष व सन २०१७-१८ मध्ये रु. ६६७.९२ लक्ष इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.
जिल्हा परिषदेला विविध योजनांतर्गत प्राप्त निधी व निकषाच्या अधिन राहून PCI प्राधान्यक्रमानुसार सदर रस्त्याचे काम करण्याचा जिल्हा परिषदेचा प्रयत्न आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**आर्णी (जि.यवतमाळ) तालुक्यातील बहुतांश गावांत जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागातंर्गत झालेले रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे असल्याबाबत**

**(४५) ११९३३२ (३०-०७-२०१८) श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आर्णी (जि.यवतमाळ) तालुक्यातील बहुतांश गावांत मोठ्या प्रमाणात जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाअंतर्गत रस्ता खडीकरण, डांबरीकरण सुरू असून हे काम निकृष्ट दर्जाचे होत असल्याची तक्रार नागरिकांकडून होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त रस्ता बांधकामात वापरल्या जाणा-या साहित्याची तपासणी करण्यात आली आहे,हे ही खरे आह काय,

(३) असल्यास, त्यानुसार निकृष्ट रस्ता बांधकाम करणा-या कंत्राटदार व अधिका-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१३-०२-२०१९) :** (१) हे खरे नाही. आर्णी उपविभागांतर्गत दोन रस्त्यांच्या कामाबाबत तक्रारी प्राप्त झाल्या होत्या.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) माळहिवरा लोनबेहळ शेलु अंजनखेड इचोरा माळेगांव सावळी इतर जिल्हा मार्ग क्र. १४२ व आर्णी कोळवण ग्रामीण मार्ग क्र. ७१ या दोन रस्त्यांच्या कामाबाबत तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. तथापि, सदर दोन्ही कामे गुणवत्तापुर्वक पुर्ण करण्यात आली असल्याने कंत्राटदार व अधिका-यांवर कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**रावेर (जि.जळगाव) तालुक्यातील ३०५४ व ५०५४ अंतर्गत मंजूर असलेल्या रस्त्यांच्या कामांबाबत**

**(४६) १२०२६७ (२४-०७-२०१८). श्री.हरीभाऊ जावळे (रावेर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रावेर (जि.जळगाव) तालुक्यातील ३०५४ व ५०५४ अंतर्गत रस्त्यांची कामे मागील १ वर्षापासून मंजूर करण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या १ वर्षापासून मंजूर असलेल्या कामांबाबत अद्याप कोणतीही कार्यवाही अथवा निविदा प्रक्रिया संबंधित विभागामार्फत पूर्ण करण्यात आलेली नसल्याचे माहे मे-२०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास,सदर रस्त्यांची पाहणी केली आहे काय व त्यानुसार वाहतुकीस या रस्त्यांची कामे तात्काळ पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१३-०२-२०१९) :** (१) हे खरे नाही, सदर योजनेअंतर्गत कामांना मंजूरी माहे फेब्रुवारी व मार्च २०१८ मध्ये देण्यात आली आहे.
(२) ८ कामांना कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत. तर ४ कामांच्या निविदा प्रक्रिया प्रगतीत आहेत.
(३) मंजूर रस्त्यांची पाहणी जिल्हा परिषदेमार्फत करण्यात आली असून कामे विहित मुदतीत पूर्ण करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**यावल (जि.जळगाव) तालुक्यातील दुसखेडा रेल्वेगेट ते दुसखेडा गावामध्ये जाणा-या रस्त्याची झालेली दुरवस्था**

**(४७) १२०७६६ (३१-०७-२०१८). श्री.हरीभाऊ जावळे (रावेर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) यावल (जि.जळगाव) तालुक्यातील दुसखेडा रेल्वेगेट ते दुसखेडा गावामध्ये जाणाऱ्या रस्त्याची दुरवस्था झाली असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्त्याची शासनाने पाहणी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास,त्यानुसार सदर रस्त्याची दुरुस्ती करण्यबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (११-०२-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) जिल्हा परिषदेमार्फत सदर रस्त्याची पाहणी करण्यात आली आहे.

दुसखेडा रेल्वेगेट ते दुसखेडा हा रस्ता इतर जिल्हा मार्ग क्र.८ चा भाग रस्ता असून या भाग रस्त्याची लांबी ०/०० ते १/२५० कि.मी. आहे. सदर लांबी वाहतुक वर्दळीमुळे व पावसामुळे खराब झाली आहे. या रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करण्याची आवश्यकता आहे.

(३) सदर रस्ता PCI प्राधान्य क्रम यादीत अनुक्रमांक १६ वर आहे. तरी या रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरणाचे काम ३०५४ २१३२ ग्रामीण रस्ते विकास व मजबुतीकरण किंवा ५०५४ इतर जिल्हा रस्ते विकास व मजबुतीकरण सन २०१८-१९ अंतर्गत निधीच्या उपलब्धतेनुसार प्रस्तावित करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सावनेर व कळमेश्वर (जि.नागपूर) तालूक्यातील रस्त्यांच्या दुरूस्तीसाठी निधी मिळण्याबाबत**

**(४८) १२०८५१ (२४-०७-२०१८) श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावनेर व कळमेश्वर (जि. नागपूर) या तालूक्यातील ग्रामीण भागातील अनेक रस्ते नादुरूस्त असल्यामुळे या रस्त्यांच्या दुरूस्तीसाठी निधीच्या उपलब्धतेनुसार टप्या-टप्याने रस्त्यांची कामे करण्यात येईल असे मा. ग्रामविकास राज्यमंत्री आश्वासन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सावनेर व कळमेश्वर तालूक्यातील अत्यंत नादुरुस्त रस्त्यांची कामे करण्यासाठी यावर्षी किमान ५० कोटी रूपये निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१३-०२-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) नागपूर जिल्हा परिषदे अंतर्गत ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्ग रस्त्यांची एकूण लांबी १०९५०.४८ कि.मी. इतकी आहे.

सदर रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी शासनाकडे उपलब्ध असलेल्या निधीचे वाटप रस्त्यांच्या लांबीच्या व मानव विकास निर्देशकाच्या प्रमाणात करण्यात येते .

रस्ते व पूल, दुरुस्ती व परीरक्षण या कार्यक्रमा अंतर्गत नागपूर जिल्हयासाठी सन २०१६-१७ या आर्थिक वर्षासाठी रु.२४९०.९६ लक्ष व सन २०१७-१८ मध्ये रु. ८११.४२ लक्ष इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**साकोरे ते डॉक्टरवाडी ग्रामिण मार्ग (ता. नांदगांव, जि. नाशिक) या ग्रामिण मार्गाची झालेली दुरवस्था**

**(४९) १२१६८० (३०-०७-२०१८) श्री.पंकज भुजबळ (नांदगाव) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साकोरे ते डॉक्टरवाडी ग्रामिण मार्ग (ता. नांदगांव, जि. नाशिक) या ग्रामिण मार्गाची दुरवस्था झाल्यामुळे डॉक्टरवाडी,कोकणवाडा,बाभूळवाडी या गावातील नागरिकांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केलेली आहे काय व त्यात काय आढळून आले आहे,

(३) असल्यास, त्यानुसार सदर रस्त्याची विशेष दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१३-०२-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) प्रश्नांकित साकोरे ते डॉक्टरवाडी या इतर जिल्हा मार्ग क्र. १५५ ची जिल्हा परिषदेमार्फत पाहणी करण्यात आली असून या रस्त्याची दुरुस्ती करणे आवश्यक आहे.

(३) सदर रस्ता मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेच्या आराखड्यामध्ये (M-५)समाविष्ट आहे. प्राधान्यक्रमानुसार सदर रस्त्याचे काम करण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कुदनुर ते किरवाड (ता.चंदगड, जि.कोल्हापूर ) या रस्त्याची झालेली दुरावस्था**

**(५०) १२३०३३ (२०-०७-२०१८) श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुदनुर ते किरवाड (ता.चंदगड, जि.कोल्हापूर) या चार कि.मी. लांबीच्या किटवाड गावाला जोडणाऱ्या एकमेव मुख्य रस्त्याची दुरवस्था झाल्यामुळे रस्त्यावरील चारचाकी वाहतूक बंद करण्यात आली असून त्यामुळे नागरिकांची अत्यंत गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रस्त्याची पाहणी तहसिलदार, चंदगड व स्थानिक लोकप्रतिनिधींनी केली असून रस्त्याची तात्काळ दुरुस्ती करण्याबाबत लोकप्रतिनिधींनी मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांना दिनांक ७ मार्च, २०१८ रोजी वा त्यासुमारास पत्राव्दारे कळविले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार सदर रस्त्याची तात्काळ दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्रीमती पंकजा मुंडे (१३-०२-२०१९) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.
सदर रस्त्यावरुन दुचाकी वाहतुक सुरु असून इतर जिल्हा मार्ग क्र. १५४ व १५५ या पर्यायी मार्गाने चारचाकी वाहतुक सुरु आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) प्रश्नांकित रस्ता जिल्हा परिषदेच्या अखत्यारीत असून या रस्त्याची पाहणी जिल्हा परिषदेमार्फत करण्यात आली आहे.

(४) चंदगड तालुका हा अतिपावसाळी विभागात येत असल्याने या विभागातील अतिपावसामुळे रस्ते खराब होण्याचे प्रमाण जास्त आहे. सदर रस्ता प्रजिमा ६५ पासून कुदनूर किटवाड जिल्हा हद्दीपर्यंतचा रस्ता इतर जिल्हा मार्ग क्र.१५६ असून या रस्त्याची लांबी ३.१० कि.मी. इतकी आहे. या रस्त्याची दुरुस्ती करणे आवश्यक आहे. या रस्त्यावरील मोरीच्या बांधकामास प्रशासकीय मान्यता प्राप्त असून अनुदानाच्या उपलब्धतेनुसार रस्त्याच्या दुरुस्तीचे काम हाती घेण्याचा जिल्हा परिषदेचा प्रयत्न आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.